श्री.अशोक उत्तम घाणमोडे, सहाय्यक लेखाधिकारी
यांचे गैरव्यवहार/गैरवर्तणूकीबाबत त्यांचेविरुध्द
शिस्तभंगविषयक कारवाई करणेबाबत...

अहिल्यानगर जिल्हा परिषद
अर्थ विभाग
आदेश क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/४८६/२०२५
अहिल्यानगर दिनांक २८/११/२०२५

वाचा :- १) या कार्यालयाचे ज्ञापन/दोषारोप पत्र जा.क्र.अर्थ /कार्या-१/आस्था-१/३२९/२०२३ दिनांक १३/१०/२०२३
२) श्री.ए.यु.घाणमोडे,सहा.लेखाधिकारी यांनी सादर केलेला खुलासा दिनांक १२/१२/२०२३
३) या कार्यालयाचा आदेश क्र.अर्थ/कार्या-१/अस्था-१/७३/२०२४ दिनांक १३/०२/२०२४
४) सहाय्यक आयुक्त (चौकशी),नाशिक विभाग नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा.४/खाचौ/सी.आर.२३/२०२४ दि. २४/०६/२०२५
५) महा.जि.प.जि.से.(शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग ३ नियम ४
६) इकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/४२२/२०२५ दिनांक ०७/१०/२०२५
७) श्री.ए.यु.घाणमोडे,सहा.लेखाधिकारी यांनी सादर केलेला खुलासा दिनांक १७/१०/२०२५

श्री.अशोक उत्तम घाणमोडे, सहाय्यक लेखाधिकारी हे जि.प.सा.बां.उत्तरविभाग,अहिल्यानगर येथे कार्यरत असताना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील आदेशान्वये करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीनुसार श्री.घाणमोडे यांनी कार्यालयीन कामकाजात गैरवर्तणूक केलेचे निदर्शनास आलेमुळे संदर्भ क्रं.१ अन्वये श्री.घाणमोडे, सहाय्यक लेखाधिकारी यांचेविरुध्द दोषारोप पत्र बजावण्यात आलेले होते. सदर बजावलेल्या दोषारोप पत्रास संदर्भ क्रं.२ अन्वये श्री.घाणमोडे यांनी खुलासा सादर केलेला होता. तथापी श्री.घाणमोडे यांनी त्यांचेवरील आरोप अमान्य केल्याने व सदर खुलासा समाधानकारक नसल्याने संदर्भ क्रं.३ अन्वये कार्यालयाने त्यांचेविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांच्या संदर्भात विभागीय चौकशी करणेकामी विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी) आयुक्त कार्यालय, नाशिक यांची नेमणुक केलेली होती.

त्याप्रमाणे चौकशीचे कामकाज पुर्ण करुन सहाय्यक आयुक्त (चौकशी),नाशिक विभाग नाशिक यांचेकडील संदर्भ क्रं.४ अन्वये चौकशी अहवाल प्राप्त झालेला असून त्यांनी दोषारोपाप्रमाणे निष्कर्ष खालीलप्रमाणे दिलेले आहेत.

| आरोप क्र. | दोषारोपाचे विवरण | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | पंचायत राज समिती परिच्छेदांची पुर्तता न करणे. | आरोप सिध्द होतो |
| २ | स्थानिक निधी लेखा परिक्षणाबाबतच्या परिच्छेदांची पुर्तता न करणे. | आरोप सिध्द होतो |
| ३ | अनुदान व खर्चाचा ताळमेळ न घेणे. | आरोप सिध्द होतो |
| ४ | लेखा विषयक नोंदवहया अदयावत न ठेवणे. | आरोप सिध्द होतो |
| ५ | आयटी, जीएसटी इत्यादी कपाती शासनास वेळेत भरणा न करणे. | आरोप सिध्द होतो |
| ६ | मासिक खर्चाची माहिती विविध बैठकांना सादर न करणे. | आरोप सिध्द होतो |
| ७ | संबंधितास ते कार्यरत असलेल्या आस्थापने मार्फत वेळोवेळी देण्यात आलेल्या नोटीसच्या अनुषंगाने तपासणी करणे. | आरोप सिध्द होतो |
| ८ | कार्यालयीन नोटीशीस उत्तरे/खुलासा न देणे. | आरोप सिध्द होतो |
| ९ | स्थानिक निधी लेखा यांना दप्तर उपलब्ध करुन न देणे. | आरोप सिध्द होतो |
| १० | बदली टाळण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाचा दबाव आणणे. | आरोप सिध्द होतो |
| ११ | शासकीय निवासस्थान रिक्त न करणे तसेच शहरात स्वतःचे मालकीचे निवासस्थान असताना कार्यालयाची दिशाभुल करुन शासकीय निवासस्थान ताब्यात घेणे | आरोप सिध्द होतो |

पुढील पानावर पहा..

..मागील पानावरुन पुढे..

त्यानुसार दोषारोप व निष्कर्षास अनुसरुन कार्यालयाने इकडील संदर्भ क्रं.६ अन्वये श्री.ए.यु.घाणमोडे, सहाय्यक लेखाधिकारी यांना म.जि.प.जि.से.(शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग तीन नियम ४(दोन) नुसार पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशा रितीने तीन वर्षाकरीता थोपविणे ही शिक्षा प्रस्तावित करुन अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावणेत आलेली होती. सदर नोटीसला अनुसरुन संदर्भ क्रं.७ अन्वये श्री.घाणमोडे यांचा खुलासा प्राप्त झालेला आहे.

श्री.घाणमोडे यांनी त्यांचे खुलाशामध्ये नमुद केलेप्रमाणे ते विभागीय चौकशीचे कामकाज चालु असताना मुलीचे लग्नकार्यानिमित्त व्यस्त असल्याने तसेच ते स्वतः आजारी असल्याने चौकशी समितीपुढे तथ्य भक्कमपणे मांडू शकलेले नाहीत.चौकशी समितीमध्ये सिध्द झालेले बहुतांश आरोप ते करीत असलेल्या पर्यवेक्षकीय कामकाजासंबधी आहेत.व त्याबाबत संबधित कामकाज करणा-या कर्मचारी यांनी हलगर्जीपणा केलेला आहे.व त्यांचे हलगर्जीपणामुळे त्यांना जबाबदार धरण्यात आलेले आहे.तसेच सदर बचावाच्या निवेदनानुसार त्यांचेवर मोठया प्रमाणात कौटुंबीक जबाबदारी व कर्ज असून ते स्वतः आजारी असतात.त्यांचे सेवानिवृत्तीस केवळ तीन वर्ष राहीलेले आहेत. त्यानुसार प्रस्तावित केलेल्या शिक्षेमुळे त्यांना आठवा वेतन आयोग व सेवानिवृत्तीनंतर मोठया प्रमाणात आर्थिक हानी होऊ शकते. सबब त्यांनी दिलेला खुलासा मान्य करुन एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात थोपविणे हि शिक्षा अंतिम करावी अशी विनंती केलेली आहे.

संदर्भ क्रमांक ३ अन्वये श्री.घाणमोडे यांना चौकशी प्राधिकरणाकडे बाजू मांडण्याची संधी देणेत आलेली आहे. तथापी संदर्भ क्रमांक ४ अन्वये प्राप्त चौकशी अहवालानुसार श्री.घाणमोडे, सहाय्यक लेखाधिकारी यांचेविरुध्द बजावण्यात आलेले सर्व आरोप सिध्द झालेले आहेत. व त्याप्रमाणे चौकशी अहवाल प्राप्त झालेला आहे.

त्याप्रमाणे श्री.घाणमोडे यांना वरीलप्रमाणे दिलेली अंतिम कारणे दाखवा नोटीस व त्याअनुषंगाने श्री.घाणमोडे यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

श्री.घाणमोडे यांचेबाबतीत संदर्भ क्रं.४ मधील चौकशी अहवालातील त्यांचेविरुध्द निश्चित करणेत आलेले आरोप क्रं.१ ते ११ हे सर्व आरोप सिध्द होत आहेत. सबब श्री.ए.यु.घाणमोडे,सहाय्यक लेखाधिकारी यांचेविरुध्द सिध्द झालेल्या उक्त नमुद दोषारोपातील गैरवर्तनामुळे त्यांचेकडून महाराष्ट्र जिल्हा परिषद.जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ (३) चे उल्लंघन केल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे श्री.ए.यु.घाणमोडे, सहाय्यक लेखाधिकारी हे खात्यामार्फत होणा-या शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र ठरतात. सबब महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग तीन नियम ४ ( २ ) नुसार आपणाविरुध्द पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशारितीने दोन वर्षाकरीता थोपविणे ---- ही शिक्षा या आदेशान्वये अंतिम करण्यात येत आहे.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्र. २०२५११२८०५००६७ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 28-11-2025 19:26:08
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री.ए.यु.घाणमोडे,सहाय्यक लेखाधिकारी
जि.प.सा.बां.दक्षिण विभाग अहिल्यानगर

व्दारा व प्रत : कार्यकारी अभियंता,जि.प.सा.बां.दक्षिण विभाग,अहिल्यानगर

२/- सोबतचा आदेश श्री.ए.यु.घाणमोडे,सहाय्यक लेखाधिकारी यांना बजावणेत येऊन त्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेत यावी. सदर आदेशाची नोंद श्री.घाणमोडे यांचे मुळ सेवापुस्तकात घेऊन त्याची प्रमाणित केलेली छायांकीत प्रत इकडेस सादर करण्यात यावी.

प्रत- कार्यकारी अभियंता,जि.प.सा.बां.उत्तरविभाग,अहिल्यानगर.

स्वाक्षरीत/-
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर